# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १९/०८/२०२४

➢ दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. राजापेठ अप. क् ४८९/२०२४ कलम ११८ (१) ३२४ (४) , ३५२, ३५१ (३), ३(५) भा. न्या. संहिता | नंदा मार्केट राजापेठ समोर अमरावती | १८/०८/२०२४ चे १९.०० वा दाखल ता. वेळ दि. १८/०८/२०२४ चे २१.१६ वा. | प्रवण राजेंद्रकुमार कोतवाली वय ३० वर्ष रात्र चौबळ प्लॉट नंदा मार्केट अमरावती | काळया रंगाची स्पेल्डर गाडीवरील स्वार १. पिवळया रंगाचा टीशर्ट घातलेला इसम २. निळया रंगाचा टी शर्ट घातलेला इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वैळी व ठिकाणी दिनांक १८/०८/२०२४ रोजी सायकाळी ०७.०० वा दरम्यान मी माझी चार चाकी वाहन क्र. एमएच-३१/डीव्ही ९७०८ ने नंदा मार्केट येथून जयस्तंभ चौक येथे जाण्याकरिता गाडी काढत असतांना नंदा मार्केट समोद दोन इसम त्यंनी त्यांचे काळया रंगाची स्पलेंडर गाडी रस्त्यावर आडवी लावलेली होती. मी त्यांना गाडी काढणे करिता दोन तीन वेळा हार्न वाजविला परंतु त्यांनी त्यांची गाडी बाजुला घेतली नाही म्हणून मी गाडी खाली उतरुन त्यांना गाडी बाजुला घेण्यासाठी बोललो असता त्या इसमांनी माझे अंगावर धावुन येवून मला शिविगाळ करुन मला जिवे मारण्याची धमकी दिली व दोन्ही इसमांनी मला मारहाण केली माझ्या कपाळाला हातातील कडा काढून मारला त्यामुळ जखम होवून रक्त निघाले. सेच एका इसमाने माझ्या चार चाकी गाडीवर चढून गाडीच्या समोरील काच फोडल्या व त्यानंतर माझी आई व मामा नामे धनजय बोबडे यांचे सोबत पो.स्टे ला येवून सदर इसमा विरुध्द रिपोर्ट देत आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |